तरुण भारत
मंगळवार, १ मार्च २००५

# हॅलो डॉक्टर



## पुस्तक परिचय




# संशोधनात्मक अभ्यास करणारे पुस्तक

**'होमिओपॅथी' या वैद्यकशास्त्राच्या उप्चार पध्दतीच्या विकासासाठी सध्या जोरदार प्रयत्न चालू आहेत. होमिओपॅथीच्या अभ्यासक्रमासाठी अनेक महाविद्यालय भारतात निर्माण झाली आहेत. या अभ्यासक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक अशी अनेक पुस्तके आहेत, त्यात 'होमिओपॅथी– द आर्ट ऑफ रॅपीड ॲण्ड जेंटल हिलींग' हे पुस्तक अतिशय उपयुक्त ठरणार आहे. आज याच पुस्तकाचा परिचय...**

होमिओपॅथी या जर्मन वैद्यकीय उपचार पध्दतीकडे आता लोक वळू लागले आहेत. होमिओपॅथी या उपचार पध्दतीत रोगाचा समूळ नाश करण्याची क्षमता आहे. त्यासाठी रोगाच्या सखोल ज्ञानाची, त्या दिशेने अभ्यासाची आणि संशोधनाची आवश्यकता आहे. असे पुण्यातील होमिओपॅथिक डॉक्टर, डॉ. अमरसिंह निकम यांचे मत आहे. त्यांनी आपले मत आपल्या 'होमिओपॅथी– द आर्ट ऑफ रॅपीड ॲण्ड जेंटल हिलींग' या पुस्तकात आग्रहाने मांडले आहे.

होमिओपॅथी– द आर्ट ऑफ रॅपीड ॲण्ड जेंटल हिलींग हे पुस्तक वाचनीय आहे. पण या पुस्तकातून त्यांनी उपचार केलेल्या कठीण केसेसचा अभ्यास आहे. म्हणून हे पुस्तक सामान्य माणसापेक्षा होमिओपॅथीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी किंवा होमिओपॅथीची प्रॅक्टीस करणाऱ्या डॉक्टरांसाठी उपयुक्त आहे. अर्थात ज्यांना वैद्यकशाखेच्या विविध पध्दतींवर वाचायला आवडते अशांनासुध्दा हे पुस्तक आवडण्यासारखे आहे.

या पुस्तकात मेंदूचे आजार, उच्च रक्तदाब, गॅंग्रीन, मनोरुग्ण, दमा, मधुमेह, ब्रेन ट्युमर अशा दीर्घकालीन आणि दुर्धर आजारांवरसुध्दा होमिओपॅथीच्या साहाय्याने उपचार करणे कसे शक्य आहे हे स्पष्ट केले आहे. होमिओपॅथीबाबत जनसामान्यांमध्ये असणारे गैरसमज दूर करण्यासाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरते.

रुग्णाचा, त्याच्या मानसिकतेचा सखोल अभ्यास करून होमिओपॅथी उपचार पध्दतीने जलद रोगनिदान करणे शक्य असल्याचा डॉ. निकम यांचा दावा या 'केसेस' वाचल्यानंतर पटतो. होमिओपॅथीचा संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी या पुस्तकाची आवश्यकता व उपयोग निश्चित आहे. या पुस्तकाच्या प्रारंभी अनुक्रमणिकेपूर्वी होमिओपॅथीचे संस्थापक डॉ. सॅम्युअल हनीमन यांचा आणि डॉ. निकम यांचे वडील डॉ. डी. व्ही. निकम यांची छायाचित्रे आहे. तसेच त्यांच्या रुग्णालयातील रुग्णांची, शिबिरांची छायाचित्रेही पुस्तकात आहेत.

एकूण ३३ केसेसचा अभ्यासपूर्ण तपशील या पुस्तकात दिला आहे. ३३ रोगांची लक्षणे, त्या रोगांच्या गंभीरतेप्रमाणे रुग्णाची मानसिक अवस्था, त्याची वर्तनशैली, यावरून निष्कर्ष कसे काढावयाचे आणि उपचार कसा करावयाचा याचाही बारीकसारीक तपशिल आहे. तसेच उपचार पध्दतीचा रुग्णांवर कसा कसा परिणाम होत जातो, याचाही उल्लेख या एकेक केसचे वाचन करताना निदर्शनास येतो. हे पुस्तक होमिओपॅथी शिकणाऱ्यांबरोबरच होमिओपॅथी जाणून घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

**पुस्तकाचे नाव– द आर्ट ऑफ रॅपिड ॲण्ड जेन्टल हिलींग.**
**लेखक– डॉ. अमर निकम.**
**प्रकाशन– हॅपी पब्लिकेशन्स, पुणे.**
**किंमत – १५० रुपये.**